MHBU070016982021

**नि. फौ. ख. क्र. ३८५/२०२१**
**महाराष्ट्र शासन पो.स्टे.शेगाव श. वि. अमोल,**
**सिएनआरक्र. एमएचबीयू०७–००१६९८–२०२१**

**आदेश निशाणी क्रमांक ४६ खाली**
[दिनांक–०७.०१.२०२२.]

१. सदर अर्ज हा फौ.प्र.सं च्या कलम ४५१ अंतर्गत अर्जदार सिराजोद्दीन समसोद्दीन देशमुख यांनी त्याचे वाहन सोडण्यासाठी त्यांचे मुख्त्यार एजाजोद्दीन देशमुख यांच्यामार्फत केला आहे. अर्जदाराचे वाहन म्हणजे बजाज व्ही–१५ दुचाकी वाहन ज्याचा रजि. क्र. एम.एच. २८ ए.आर. ४४२८, चेचीस क्र. MD2A74BZ6GWM07096 आणि इंजिन क्र. JHZWGM07258 असे वाहन जे की, पोलिस स्टेशन शेगाव शहर यांनी गुन्हा क्र. ४५०/२०२० मध्ये जप्त केले आहे.

२. उपरोक्त वाहन पोलिसांच्या ताब्यात ठेवून कोणताही उद्देश पूर्ण होणार नाही. अशा मागणीसह, अर्जदाराने जप्त केलेल्या वाहनाचा अंतरिम ताबा त्याला देण्याची विनंती केली आहे. या व्यतिरिक्त, अर्जदाराने या कोर्टाने त्याच्यावर लादलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याचे मान्य केले आहे.

३. न्यायालयाने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे सदर अर्जावर बोलविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहन सुर्पूतनाम्यावर अर्जदारास सोडल्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे.

४. दोन्हीं पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

५. फौ.प्र.सं चे कलम ४५१ अन्वये अर्जाचा निर्णय घेतांना, अर्जदार जप्त केलेल्या वाहनाचा अंतरिम ताब्याकरिता पात्र आहे की नाही तसेच अर्जदाराच्या बाजूने वाहन सोडल्यास त्याचा अभियोग पक्षाच्या प्रकरणावर परिणाम होईल का याचा विचार

करणे आवश्यक आवश्यक असते. अर्जदाराने अर्जासोबत आधार कार्ड, मुख्त्यारपत्र, आर.सी. बुक, ड्रायव्हींग लाईसन्सच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर वाहन अर्जदार यांच्या मालकीचे आहे.

६. पुढे, गुन्ह्याचे स्वरूप लक्षात घेता, असे म्हणता येणार नाही की अर्जदाराच्या बाजूने जप्त वाहन सोडल्यास अर्जावर कोणत्याही प्रकारे परिणाम होईल. पुढे, ते अधिक काळ पोलिसांच्या ताब्यात ठेवणे योग्य होणार नाही, त्यामुळे निश्चितच त्याचे नुकसान होईल. शिवाय, *सुंदरभाई देसाई –वि– गुजरात राज्य, AIR 2003 S.C. 638* च्याबाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे की, असे जप्त केलेले वाहन पोलिस स्टेशनमध्ये दीर्घ कालावधीसाठी ठेवून उपयोग नाही. दंडाधिकाऱ्यांनी कोणत्याही वेळी आवश्यकता असल्यास, योग्य बॉण्ड आणि हमी घेऊन त्या मुद्देमालाच्या परताव्यासाठी सुरक्षा घेऊन योग्य तो आदेश देणे आवश्यक आहे.

७. वरील सर्व तथ्ये लक्षात घेता, अर्जदारावर काही अटी लादून अर्जाला परवानगी देणे आणि जप्त केलेल्या मुद्देमालाचा अंतरिम ताबा देणे योग्य ठरेल. म्हणून, मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराचे बजाज व्ही–१५ दुचाकी वाहन ज्याचा रजि. क्र. एम.एच. २८ ए.आर. ४४२८, चेचीस क्र. MD2A74BZ6GWM07096 आणि इंजिन क्र. JHZWGM07258 असे वाहन जे की, पोलिस स्टेशन शेगाव शहर यांनी गुन्हा क्र. ४५०/२०२० मध्ये जप्त केले आहे ते अर्जदार सिराजोद्दीन समसोद्दीन

देशमुख, तर्फे मुख्त्यारपत्रधारक ऐजाजुद्दीन सिराजोद्दीन देशमुख,रा. मोरे संकुल, वाडी, ता. खामगाव, जि. बुलडाणा, यांच्या नावाने रु. ९०,०००/-(रुपये नव्वद हजार पाचशे फक्त) च्या नावे सुपूर्तनामा बॉण्डवर सोडण्यात यावे.

३. नि.फौ.ख. क्र. ३८५/२०२१ या प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अर्जदाराने सदरचे वाहन कोणालाही विकू नाही. तसेच, त्याची ओळख बदलू नये असे निर्देश दिले जातात.

४. तसेच,अर्जदाराने न्यायालयाच्या निर्देशानुसार आवश्यकता भासल्यास खटल्याच्या वेळी सदरचे वाहन सादर करावे.

५. पोलीस उप निरीक्षक, पो.स्टे. शेगाव शहर यांना असे निर्देश देण्यात येते की, त्यांनी अर्जदारांच्या वाहनाचे दोन छायाचित्रे काढावी आणि ते सदर प्रकरणात दाखल करावीत.

६. अर्जदाराने बॉण्डच्या अटींचे व शर्थीचे पालन केल्यानंतर या आदेशाच्या प्रमाणित प्रतीसह पोलीस उप निरीक्षक, पो.स्टे. शेगाव शहर यांना पत्र देण्यात यावे.

स्वा/-

शेगाव:
दिं.०७.०१.२०२२.

**[जे.आर. घाडगे]**
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
शेगाव.

मी *रुपेश अशोक दांडगे*, लघुलेखक, (न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कोर्ट क्र.१ ले तथा दिवाणी न्यायाधिश क.स्तर शेगाव,ता.शेगांव,जि.बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्रीही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.